सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक
पुणे

मूल्य ३₹

संपादक : घनश्याम पाटील

www.chaprak.com

वर्ष : ६ | अंक : ०२ | पाने : ८

KaMant masale

किंग ऑफ टेस्ट

व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले

संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००

Email : dkamant@rediffmail.com Web : www.kamantmasale.com

■ सोमवार, दि. २५ ते ३१ जानेवारी २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016


Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 27/01/2016

**संपादकीय**
घनश्याम पाटील – ७०५७२९२०९२

# चोराच्या उलट्या बोंबा

***पिंपरी*** येथील ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सूप वाजले तरी त्याचे कवित्व काही थांबत नाही. साहित्य महामंडळाने संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस यांचे भाषण न छापल्याने संमेलनाध्यक्षांनी 'महामंडळ 'सेन्सॉर' कधीपासून झाले?' असा सवाल करत हा त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरचा हल्ला असल्याचे सांगितले आहे. हे विधान म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असेच म्हणावे लागेल. आक्षेपार्ह मुद्दे असल्याने संमेलनाध्यक्षांचे भाषण छापले गेले नाही, असे सांगण्यात येत असले तरी यात तथ्य नसल्याचे महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांनी स्पष्ट केले आहे.

श्रीपाल सबनीस यांनी निवडणुकीदरम्यान अनेक वाद ओढवून घेतले. त्यातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकेरी भाषेत केलेला उल्लेख मोदी विरोधकांनाही आवडला नाही. त्याचवेळी सनातन संस्थेचे वकील पुनाळेकर यांनी त्यांना 'मॉर्निंग वॉकला जात चला' असा सल्ला दिल्याने सबनीसांनी थयथयाट केला. खरेतर हा सल्ला पुनाळेकरांनी सबनीसांना आधीच द्यायला हवा होता. कारण या सल्ल्यानंतर काही तथाकथित पुरोगामी संघटनांना सोबत घेऊन त्यांनी 'मॉर्निंग वाक'ची नौटंकी केली आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधानांच्या वक्तव्याविषयी दिलगिरी



■ संमेलनाध्यक्ष श्रीपाल सबनीस व आयोजक डॉ. पी. डी. पाटील यांनी 'चपराक'च्या ग्रंथ दालनाला मुद्दामहून भेट दिली.

व्यक्त केली. एक दिवस 'मॉर्निंग वॉक'ला गेल्याने इतकी अक्कल आली; जर ते नियमित चालायला गेले असते तर कदाचित अशी दुर्दैवी वक्तव्ये केलीच नसती! असो.

महामंडळाने संमेलनाध्यक्षांचे भाषण प्रकाशक या नात्याने छापावे असा रिवाज आहे. यंदा तो खंडित झाला आहे. त्यामुळे सबनीस गळे काढत आहेत. मात्र यातील तथ्य आपण समजून घ्यायला हवे. तब्बल १३५ पानांचे हे भाषण सबनीसांनी संमेलनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे ग्रंथदिंडी सुरू असताना महामंडळाकडे दिले. याची कबुली खुद्द सबनीसांनीही दिली आहे. त्यामुळे इतक्या कमी काळात हे भाषण छापणे अवघडच आहे. याची जाण त्यांनाही असल्याने त्यांनी नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे हे भाषण स्वतःचे पैसे टाकून (किंवा प्रायोजक मिळवून) 'दिलीपराज प्रकाशन'कडून रातोरात छापून घेतले. एका रात्रीत दिलीपराज प्रकाशनचे राजीव बर्वे हे भाषण छापू शकतात तर महामंडळ का नाही? असा खुळचट सवालही सबनीसांनी केला आहे. अध्यक्षीय भाषण होण्यापूर्वीच एखादा प्रकाशक अशा पद्धतीने भाषण छापू शकतो का हेही तपासले पाहिजे; तसेच सबनीस हे भाषण स्वतः पैसे टाकून छापून घेतल्याचे सांगत असल्याने स्वतः पैसे टाकून त्यांनी आणखी काय काय उद्योग केले आहेत हेही समोर यायला हवे.

दिलीपराजची स्वतःची यंत्रणा आहे. ते प्रकाशक आहेत. महामंडळाकडे छपाईबाबत स्वतःची अशी कुठलीही साधने नाहीत. शिवाय संमेलनाची पूर्वसंध्याकाळ म्हणजे महामंडळाचे सर्व पदाधिकारी संमेलनाच्या धावपळीत असणार हेही सत्य नाकारून कसे चालेल? आपल्या जबाबदारीचे भान ठेऊन सबनीसांनी वेळीच भाषण लिहून पूर्ण केले असते तर अशी वेळ ओढवलीच नसती. काहीही झाले तरी महामंडळाला नावे ठेवत, त्यांना दूषणे देत स्वतःचा करंटेपणा, नाकर्तेपणा झाकून ठेवायचा याला काही अर्थ नाही.

हे भाषण महामंडळाने न छापल्याने आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी झाल्याचा विनोदी खुलासा अध्यक्षांनी केलाय. निवडणुकीच्या दरम्यान झालेले राजकारण आणि यांची हुजरेगिरी स्पष्टपणे मांडत संमेलनाध्यक्षांचा 'चेहरा आणि मुखवटा' दाखवून देणारा लेख 'चपराक'ने प्रकाशित केला. तो 'चपराक'च्या सदस्यांपर्यंत तर गेला होताच पण फेसबूक, ब्लॉग अशा समाजमाध्यमांबरोबरच राज्यातील अनेक वृत्तपत्रांनीही तो पुनर्मुद्रित केला होता. त्यानंतर संमेलनात 'चपराक'च्या ग्रंथ दालनात या अंकाची दोन दिवस तडाखेबंद विक्री झाली. यामुळे हबकलेल्या अध्यक्षांनी त्यांची योग्यता सिद्ध केली! संमेलन समितीच्या सदस्यांनी हे अंक जप्त केले. इतकेच नाही तर, हा अंक येथे विक्रीस ठेवला तर दालनाचा परवाना रद्द करू असा दमही भरला.

'चपराक' कधीही कुणाच्या वांझोट्या धमक्यांना भीक घालत नाही. त्यामुळे आम्ही त्याचा खंबीरपणे सामना केला. वृत्तवाहिन्यांनी हा विषय लावून धरला. 'साहित्य संमेलनातील सर्वात मोठी बातमी, 'चपराक'चे अंक जप्त' अशी बातमी सुरू झाली. झी चोवीस तास, एबीपी माझा, टीव्ही ९, आयबीएन लोकमत, जय महाराष्ट्र, महाराष्ट्र नं. १, साम टीव्ही अशा आघाडीच्या सर्वच वाहिन्यांनी आमचा आवाज तमाम मराठी बांधवापर्यंत पोहोचवला आणि यांच्या पार्श्वभागाला मिरच्या झोंबल्या. अंकातून जेवढी बदनामी झाली त्याहून मोठी नामुष्की या कृत्यामुळे होतेय, हे ध्यानात येताच ग्रंथालय समितीचे प्रतिनिधी रमेश राठिवडेकर यांनी 'चपराक'चे जप्त केलेले अंक परत आणून दिले आणि आयोजकांच्या वतीने आमची माफी मागितली. अभिव्यक्ती स्वातंत्र्याची भाषा करणारे श्रीपाल सबनीस या प्रकाराच्या वेळी हजार किलो मूग गिळून गप्प होते.

'विचारांचा सामना विचारांनीच केला पाहिजे' असे घसा ताणून सांगणारे यावेळी मात्र चिडीचूप होते. प्रसारमाध्यमांच्या दणक्यामुळे जागे झालेल्या आयोजक पी. डी. पाटील यांनी संमेलनाध्यक्षांना सोबत घेऊन मुद्दाम 'चपराक'च्या दालनाला भेट दिली आणि वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

■ माध्यमांच्या दणक्यानंतर ग्रंथ प्रदर्शन समितीचे प्रतिनिधी रमेश राठिवडेकर यांनी 'चपराक' मासिकाचे अंक परत आणून दिले.



मात्र तोपर्यंत व्हायची तेवढी शोभा झाली होती. 'नवाकाळ'सारख्या आघाडीच्या वृत्तपत्राने तर दुसऱ्या दिवशी पहिल्या पानावर तीन ओळींचे शीर्षक देत, आमच्या फोटोसह आठ कॉलमची बातमी केली. 'कुत्र्याला खीर पचली नाही' हा आमचा लेख पुनर्मुद्रित केला. अनेक वृत्तपत्रांनी 'चपराक'च्या भूमिकेला पाठिंबा देत अग्रलेख केले. विशेष लेखात या घटनेचा निषेध नोंदवला. मात्र पुरोगामी म्हणून मिरवणाऱ्यापैकी कुणीही एका शब्दात याचा निषेध नोंदवला नाही. (अपवाद सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी यांचा. ते 'चपराक' परिवाराचेच सदस्य आहेत.)

निवडून आल्यानंतर पहिल्या दिवसापासून 'अपमान सहन करणार नाही' असे बेंबीच्या देठापासून ओरडून सांगणाऱ्या सबनीसांना त्यांच्या विक्षिप्तपणामुळे अपमानाशिवाय दुर्दैवाने काहीच पदरात पडले नाही. घुमानच्या संमेलनात सदानंद मोरे यांची खुर्ची कशी बाजूला सरकवली गेली याचे माध्यम प्रतिनिधीसमोर चवीने वर्णन करणाऱ्या सबनीसांना पहिल्या रांगेत स्थानही मिळाले नाही. संमेलन परिसरात आणि इतरत्र जे फ्लेक्स लावले गेले होते त्यावर केवळ स्वागताध्यक्ष पी. डी. पाटील यांचाच फोटो होता. नरेंद्र मोदी यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याबद्दल त्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागली. संमेलनातील बहुतेक सत्कार पी. डी. पाटील यांच्याच हस्ते करण्यात आले. 'ऊठ म्हटले की उठायचे आणि बस म्हटले की बसायचे' इतकी त्यांची केविलवाणी अवस्था झाली होती आणि ती प्रत्येकाला जाणवत होती. यांची सतत चर्चेत असणारी 'तिसरी भूमिका' अध्यक्षीय भाषणातून कळेल असे वाटत होते; *पान २ वर...*

पान १ वरून...


## चोराच्या उलट्या बोंबा

मात्र तीस मिनिटाच्या भाषणातील पंधरा मिनिटे त्यांनी उपस्थितांची नावे घेण्यातच घालवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पूर्वसंकेत बाजूला सारून सबनीसांच्या भाषणाच्या आधीच निघून गेले. आणखी हास्यास्पद म्हणजे, प्रोटोकॉलची माहिती नसलेल्या, किमान अभ्यास नसलेल्या सबनीसांनी मुख्यमंत्री गेल्यानंतर त्यांच्या दौऱ्याची माहिती भाषणातून दिली. मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने हे घातक आहे, इतकेही भान त्यांना नव्हते. उदय निरगुडकर यांच्यासारख्या अभ्यासू संपादकाने 'झी चोवीस तास' वरून विशेष संपादकीय प्रसारित केले होते. त्याबद्दल अध्यक्षांनी जाहीर खंत व्यक्त केली.

म्हणजे त्यांचा पोलखोल करणारे 'चपराक'चे अंक दडपशाहीने जप्त करणारे, त्यांच्याविषयी स्पष्टपणे लिहिणाऱ्या उदय निरगुडकर यांच्यासारख्या ज्येष्ठ संपादकांविषयी खंत व्यक्त करणारे, संमेलनाच्या पूर्वसंध्येला १३५ पानांचे भाषण लिहून ते महामंडळाकडे सोपवणारे सबनीस अभिव्यक्ती स्वांतत्र्याच्या नावे बोंब ठोकत आहेत. हे सारे जितके हास्यास्पद आहे तितका त्यांचा अविवेक, अप्रगल्भता दाखवून देणारे आहे. बरे, आता हे भाषण पुन्हा छापू असे महामंडळाच्या अध्यक्षा असलेल्या वैद्य बाईंनी सांगितले आहे. ते छापले तरी आता साहित्य रसिकांपर्यंत कसे पोहोचणार हे या दोघांनाच ठाऊक. दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांचे भाषण पानेच्या पाने छापणाऱ्या माध्यमांनी यावेळी त्यांची फारशी दखल घेतली नाही, यातून सबनीसांनी काहीतरी बोध घ्यायला हवा होता.

आता २६ जानेवारीपर्यंत हे भाषण महामंडळाने छापले नाही तर सपत्निक ते महामंडळाच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहेत. तसा दम त्यांनी पत्रकार परिषदेत भरला आहे. इतकी शोभा होऊनही त्यांचे भाषण छापले जावे आणि ते वाचकांनी वाचावे असा दुराग्रह ते धरत आहेत. अध्यक्षीय भाषणाची पुस्तिका छापण्याचा आपल्याकडे रिवाज असला तरी यांचे यावेळी १३५ पानांचे पुस्तकच झाले आहे. सरकारी पैशाने ते का छापावे आणि असले कंटाळवाणे लेखन वाचकांनी का वाचावे हाही प्रश्नच आहे. सरकारी पैशाची अशी उधळपट्टी करून अमर होण्याचा अट्टाहास कशासाठी? संमेलनाच्या व्यासपीठावरून काही 'विचार' दिला असता तर 'माझे विचार पोहोचवा' असे म्हणत उपोषणाला बसण्याची वेळच आली नसती. शिवाय आता हे भाषण छापणे म्हणजे लग्न पार पडून मधुचंद्राला गेल्यानंतर सगळ्यांना अक्षता वाटत फिरण्यासारखे विनोदी आहे.

मराठी साहित्य आणि प्रकाशन व्यवहाराच्या दृष्टिने या चोराच्या उलट्या बोंबा असून त्या घातक आहेत. साहित्याची, साहित्यिकांची झाली तेवढी शोभा पुरेशी आहे. आता आपली असलेली, नसलेली अक्कल न पाजळता संमेलनाध्यक्षांनी सवंग लोकप्रियतेसाठीची नौटंकी (ड्रेनेज ड्रामा) बंद करून मराठी साहित्यासाठी काही करता आले तर पहावे. ■■



शब्दतरंग
सदानंद भणगे, नगर
९८९०६२५८८०

# अपघात

***या हिंदी*** सिनेमावाल्यांचं मला नेहमी आश्चर्य वाटतं. अपघातानं ठार वेडा झालेला इसम सिनेमाच्या शेवटी तसल्याच एखाद्या अपघातानं एकदम खडखडीत बरा होतो. माझ्या पाहण्यात असा कोणी नाही. तुमच्या पाहण्यात असल्यास कळवावे. आपण भेटायला जाऊ. म्हणून तर एखादा ठार वेडा दिसला की मला प्रकर्षाणं जाणवतं की ह्याला जोरदार दणका देऊन पहावा. कदाचित ह्याची 'खोई हुई यारदाश' पुन्हा येईल आणि तो एकदम चांगला वागायला लागेल; पण मी मोह आवरतो कारण वेड्याला मारणारा महावेडा म्हणून दुसऱ्या दिवशीपासून मीच वेडा व्हायचो आणि माझा स्मृतीभ्रंश व्हायचा.

मात्र माझ्या पाहण्यात एक उदाहरण आहे. एक वाया गेलेला. मवाली बनलेला तरूण अपघातानं एकदम सुधारला. महाबळेश्वरला नको ते साहस करायला गेला आणि क्षणार्धात कड्यावरून निसटला. नशिबाने एका कपारीला आडकला. खाली प्रचंड दरी मृत्यूचा जबडा पसरून त्याची वाट पाहत होती. प्रत्यक्ष मृत्यू त्याला दिसला होता; मात्र लोक मदतीला धावले. दोरखंडाच्या सहाय्याने त्याला वर काढण्यात आले आणि तो ओक्साबोक्सी रडू लागला. क्षणाधार्त तो बदलला. त्याचा मवालीपणा बंद झाला. गुंडगीरी बंद झाली. आईवडिलांना आश्चर्याचा सुखद धक्काच होता तो. आज त्यानं व्यवसाय थाटलाय. सुखानं जगतोय.



अपघात माणसाला माणसात आणतात तर अपघात माणसाला माणसातून उठवूही शकतात. केवळ अपघातानच गुंडगिरीच्या वाटेवर गेलेला तरूण वा बेकारीच्या खाईत लोटले गेलेले तरूण केवळ पैसा मिळावा म्हणून वाममार्गाला लागतात आणि अपघातानाच गुंड बनतात. एकदा कपाळी वाईटपणाचा शिक्का बसला की कुठल्याही अपघातानं तो पुसता येत नाही कारण ते आयुष्य असतं. हिंदी सिनेमा नसतो.

अपघातानं प्रिय माणसं दूर जाऊ शकतात. तर अपघातानच आपलं माणूस सापडतं. खऱ्या मित्राची पारख संकटकाळी होते हेच खरं. अपघातात जो मदत करतो तो आपला होऊन जातो. एखाद्यावर आघात करून माणसं दुरावल्याचं आपण सिनेमातून पाहतो. बहुदा खलनायकांचा तो खानदानी धंदाच असतो; मात्र शेवटच्या अपघातात नायक कधीच मरत नाही. खलनायकाची मोटार चारी मुंड्या चित (वा चारी चाकं वर होऊन) पडते, वा मोठ्या उंच कड्यावरून दरीत पडते आणि मध्येच जाळाचा भडका उडून सगळी गाडी पेट घेते (पहा कोणत्याही हिंदी सिनेमात खलनायकाचा शेवट!) थोडक्यात काय अपघात माणसाला बरंच काही शिकवतो.

काही लेखक मंडळी लहानपणापासूनच ठरवून लेखक होतात. मी मात्र अपघातानच लेखक झालो. नैराश्याच्या खाईत कधी काळी लोटला गेला असता अचानक कवितेचे शब्द कागदावर उतरले. त्या शब्दांचं कौतुक गुरूजनांनी केलं आणि वाचकांचा पाठिंबा मिळताच, कांदबरी, कविता, कथा, एकांकिका, नाटक, लेख ह्यांची निर्मिती व्हायला लागली. अपघाताचा केवढा हा फायदा. आज मला ही माझी वाचक मंडळी मिळाली. हक्काची माणसं मिळालीत. ह्या हजारो शुभेच्छा, आशीर्वाद नोकरी करून थोडीच मिळाल्या असत्या? म्हणून माझ्या बाबतीत अपघात वरदानच ठरला.

खरं तर अपघात हा अपघातच असतो म्हणतात. म्हणजे तो अनपेक्षितरित्या सामोरे येतो. काही समजायच्या आत घडतो, पण आजाकाल ही व्याख्यापण बदलायला लागलीय. आजकाल अपघातसुद्धा घडवून आणले जातात त्यातून कुणाला काय मिळतं हा भाग वेगळा मात्र निष्पाप लोक आयुष्याला मुकतात. एखाद्या दंगलीत काही लोक निष्कारणच बळी पडतात. वाहनांचं निष्कारण नुकसान होतं.

लोकसंख्या वाढू लाली, वाहनं वाढली आणि रस्त्यावरचे अपघात वाढले. आपण आपलं वाहन नियमाने चालवलं, कमी वेगाने जरी चालवलं तरी दुसरा कुणीतरी नियम तोडून आपल्यावर येऊन धडकतो. अशा वेळी काय म्हणणार. समोरच्याच्या लक्षात जेव्हा हे येईल तेव्हाच अपघात कमी होतील. अन्यथा आपण काही हिंदी सिनेमा प्रमाणे दुसऱ्या अपघातात सापडून पुन्हा पहिल्यासारखे होण्याइतके भाग्यवंत नक्कीच नाही हे लक्षात ठेवावे. ■



# अबब! काय ही थंडी!

उशीरा का होईना सर्वत्र थंडीचं आगमन अगदी दमदारपणे झालेलं आहे. खूप वर्षांनी इतकी कडक्याची थंडी पडली आहे. काश्मीरी शॉल लपेटून एका हातात गरम गरम वाफाळलेला आल्याचा चहा तर दुसऱ्या हातात वाचायला काही आवडतं साहित्य, कानात काही कर्णमधुर संगीत असा सर्व सरंजाम करून उनात छान निवांत सोनेरी किरणं अंगावर घेत बसायचं ...म्हणजे थंडीचा खराखुरा आनंद म्हणायला हरकत नाही.

हिवाळा ऋतु तसा आरोग्याच्या दृष्टीकोनाने अतिउत्तम! परंतु हाच हिवाळा आपल्या त्वचेसाठी अंत्यत वाईट काळ समजला जातो. या काळात आपली त्वचा संपूर्णपणे कोरडी पडते. हिवाळ्यात आपण काही गोष्टिंची काळजी घेतली तर आपल्या त्वचेची थंडीमुळे होणारी हानी टाळू शकतो.

→ थंडीच्या दिवसांत आपण सर्वजण हॉट स्टिमिंग शॉवरच्या प्रेमात पडतो, कडक पाण्याची आंघोळ छान वाटते. परंतु त्यामुळे त्वचेवर वाईट परिणाम होतात.

→ थंडीच्या दिवसांत त्वचेचा कोरडेपणा खूप वाढतो, कोरडेपणामुळे सर्वांगाला खाजपण सुटते. हे टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. थोडं कोमट पाणी प्या. जसे उन्हाळयात आपण गार पाणी पिण्याची इच्छा करतो तसेच कडाक्याच्या थंडीत गरम/कोमट पाणी पिण्याचा आग्रह धरावा. पाण्यामुळे त्वचेचा टवटवीतपणा टिकून राहण्यास मदत होते.

→ त्वचेवरील स्निग्धता कायम राहण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात टोपणभर चांगल्या प्रतीचे तिळतेल किंवा ऑलिव्ह ऑईल किंवा नारळाचे तेल टाकावे.

→ हिवाळ्यात जठराग्नी अधिक प्रदिप्त होतो. भूक अधिक लागते, आपण नेहमीपेक्षा जास्त आहार घेतो पण आरोग्याच्या दृष्टिकोनातून फलदायी असा आहार घेतल्यास अधिक उत्तम. त्वचेच्या आरोग्यासाठी तुमच्या आहारात अधिक प्रमाणात दुध, तूप, फळं किंवा फळांचा रस असावा. तर मनुका, किसमिस, अजींर, पेंडखजूर असे रक्तशुद्ध करणारे पदार्थदेखील रोज खावे.

→ हिवाळ्याच्या दिवसात आपली शक्ती निसर्गतः चांगली वाढलेली असते. घाम लवकर येत नाही. त्यासाठी शास्त्रात असा आदेश आहे. प्रत्येकाने आपल्या अर्धशक्तीनुसार व्यायाम करावा. नियमित व्यायामाने व पुरेशी झोप घेतल्याने त्वचा तजेलदार राहते.

→ या दिवसात घाम आलेला चांगलाच! तर आठवड्यातून दोनदा छान वाफ घ्यावी. सर्वांग स्नेहन स्वेदन केलेले चांगलेच पण शक्य नसल्यास किमान चेहऱ्याला तरी वाफ घ्यावी. त्यासाठी गरम पाणी उकळताना त्यात कडुनिंबाची पाने, तुळशीची पाने वा थोडंसं लिंबू रसाचे थेंब घालावे.

→ हिवाळ्यात केसात कोंड्याचं प्रमाण विलक्षण वाढतं त्यासाठी रोज रात्री केसांना तेल कोमट करून न चुकता लावावे. खूप तेलकटपणा आवडत नसल्यास सकाळी केस शिकेकाई काढ्याने धुवून घ्यावेत. गारव्यामुळे केस धुण्याचा कंटाळा करू नये.

→ केस धुण्यापूर्वी अधुनमधून केसांनासुद्धा वाफ द्यावी. त्यासाठी जेष्ठमध, त्रिफळा ह्या वनौषधींचा काढा करावा. त्यात जाडसर टर्किशचा टॉवेल बुडवून काढावा व पिळून केसांना थोड्या वेळासाठी बांधावा.

नेहमीप्रमाणे आपण हा लेख वाचून इतरांच्या उपयोगी आहे असे वाटल्यास नक्की शेयर करा व ०९३२६५११६८१ या व्हॉट्स एप वर प्रतिक्रिया द्या.

■ डॉ. कविता पवन लड्डा
लड्डा आयुर्वेदिक चिकित्सालय, पंचकर्म
लातूर,
भ्रमणध्वनी : ०९३२६५ ११६८१



■ भाऊ तोरसेकर
भ्रमणध्वनी : ९७०२१३४६२४

# दोनदा आडवा आलेला
# सभ्यपणा व सुसंस्कृतपणा





***नुकत्याच*** संपलेल्या पिंपरी चिंचवड येथील मराठी साहित्य संमेलनात गाजलेला साहित्यिक विषय, म्हणजे 'जाणता राजा' शरद पवार यांची मुलाखत! त्यात मुलाखतकारांनीच अधिक बोलून पवारांना बोलायलाच वेळच दिला नाही, असे बहुतेक माध्यमांनी स्पष्ट केले आहे; पण तीच तर आजकालची पद्धत आहे ना? प्रत्येकजण अर्णब गोस्वामी व्हायला धडपडत असतो आणि अर्णब व्हायचे तर ज्याची मुलाखत आहे, त्याला शब्दही बोलू द्यायचा नसतो ना? मग त्याच वास्तवाचा प्रभाव साहित्य संमेलनावर पडल्यास गैर ते काय? या मुलाखतीत पवारांना खूप कमी बोलण्याची संधी मिळाली, तरी त्यांनी काही महत्त्वाचे राजकीय व ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट केले. त्यापैकी एक म्हणजे मराठी माणसाला हुकलेले देशाचे पंतप्रधानपद! खुद्द पवार साहेब मागील दोन दशके मोठ्या आतुरतेने त्या पदावर आरुढ व्हायला सज्ज होऊन बसले आहेत; पण तशी संधीच त्यांच्या दिशेने येत नाही आणि आलीच असेल, तर तिला पिटाळून लावण्यात पवारांचा हातखंडा आहे. मात्र पवारांनी मुलाखतीत आपल्या हुकलेल्या संधीचा विषयच येऊ दिला नाही. तर मराठी माणसाला तशी संधी होती, तो इतिहास सांगितला. तब्बल अर्धशतकापूर्वी दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे आकस्मिक निधन झाले आणि नव्या पंतप्रधानाची निवड व्हायची होती. त्यावेळी केंद्रात यशवंतराव चव्हाण यांची प्रतिमा खूप उजळ होती. सहाजिकच काँग्रेसश्रेष्ठी त्यांच्याच नावाचा विचार करीत होते; पण चव्हाण पडले भिडस्त आणि सभ्य! कुठलाही दावा करण्यापेक्षा त्यांनी आपल्या समर्थक अनुयायांची बैठक घेऊन त्यावर विचारविनियम केला. त्या गडबडीत संधी कशी निघून गेली, त्याचा संदर्भ पवारांनी सविस्तर कथन केला आहे. तो अर्थातच यशवंतरावांच्या थोरपणाचा नमूना म्हणता येईल. सभ्यपणा व सुसंस्कृतपणा हा चव्हाणांच्या राजकारणाचा पाया होता.

शास्त्री यांचे निधन झाल्यावर संधी आलेली असताना आपल्यावर पंडित नेहरू व इंदिराजींचे असलेले उपकार चव्हाण विसरले नाहीत. म्हणूनच दावा करण्याच्याही आधी इंदिराजींकडे त्याबद्दल विचारणा करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसे केल्यास इंदिराजी आपलेच घोडे पुढे दामटतील, अशी शंका किंवा भिती पवारांनी तेव्हा व्यक्त केली होती. त्यावर यशवंतराव रागावले; पण शेवटी पवार यांचेच शब्द खरे ठरले. कारण चव्हाणांनी विचारणा केल्यावर दुसऱ्या दिवशी इंदिराजींनीच आपण दावा करणार असल्याचे चव्हाणांना कळवले आणि परस्पर मराठी माणसाचा दावा निकालात निघाला. चव्हाणांनी तसे कशामुळे केले? तर त्याला सभ्यपणा व सुसंस्कृतपणा म्हणतात. ते शब्द अर्थातच मुलाखतीत पवारांनीच वापरले आहेत; पण तोच सभ्यपणा चव्हाणांच्या पंतप्रधान पदावर आरूढ होण्यास आडवा आला, असेही शरद पवार म्हणतात. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. सत्तापदाला असलेला धोका आमदारही नसताना कोवळ्या वयात पवार ओळखू लागले होते. कारण हा प्रसंग घडला, तेव्हा १९६६ सालात पवार आमदारही झालेले नव्हते; पण पंतप्रधान पदाच्या घडामोडीतही किती बारकाईने लक्ष घालत होते, त्याची साक्ष मिळते. त्यात चव्हाणांनी सभ्यपणा दाखवून पूर्वी इंदिराजींनी केलेल्या मदतीचे स्मरण ठेवले. हाच तो सभ्यपणा असतो ना? तोच यशवंतरावांनी दाखवायला नको होता, असा पवारांचा आग्रह होता. अर्थात त्याला चव्हाण बधले नाहीत. त्यांनी पंतप्रधानपदावर पाणी सोडून सभ्यपणाला साथ दिली. हाच गुरू शिष्यातला फरक आहे; पण पवारांना अजून त्याचा अर्थ उमगलेला नसावा. अन्यथा त्यांनी सभ्यपणा व सुसंस्कृतपणा 'आडवा' आला, अशी भाषा केली नसती की आपण तसे सभ्य सुसंस्कृत नाही हे लोकांना ठाऊक असतानाही पुन्हा ओरडून जाहिरपणे सांगायची गरज पवारांना वाटली नसती.

२०१२ च्या महापालिका निवडणूका चालू असताना अनेक वाहिन्यांनी बड्या नेत्यांच्या प्रदिर्घ मुलाखती घेतल्या होत्या. त्यापैकी एका मुलाखतीत चव्हाणांच्या पंतप्रधान पदाच्या संधीचा दुसरा किस्सा पवारांनीच कथन केला होता. १९७९ सालात मोरारजींचे जनता सरकार कोसळले आणि विरोधी नेता असलेल्या यशवंतरावांना राष्ट्रपती संजीव रेड्डी यांनी सरकार स्थापनेचे आमंत्रण दिले होते. तर संख्या बघून सांगतो, असे चव्हाणांनी कळवले. नंतर पाठीशी बहुमत नसल्याचे मान्य करून माघार घेतली. पुढे चव्हाण रेड्डी एकत्र जुन्या आठवणी काढत बसले असताना, संजीव रेड्डी यांनी तो प्रसंग आठवून केलेली शेरेबाजी पवारांनी इथे कथन केली. रेड्डी चव्हाणांना म्हणाले, ''तशी ऑफर शरदला दिली असती, तर आधी पंतप्रधान पदाची शपथ घेऊन मगच तो बहुमताची जुळवाजुळव करायला गेला असता.'' हा किस्सा सांगून पवारांनी विषय हसण्यावारी नेला; पण पिंपरीत ज्या सभ्य सुसंस्कृतपणाचे वावडे पवारांना सतावत होते, त्याचा चार वर्षे जुन्या मुलाखतीशी संबंध असू शकतो का? एकदा नव्हेतर दोनदा चव्हाणांनी पंतप्रधान पदाची संधी गमावली. ती सभ्यपणा, सुसंस्कृतपणा इतकीच प्रामाणिकपणामुळे गमावली. आपण त्यांच्या जागी असतो, तर अशा सद्गुणांची किंचितही बाधा होऊ दिली नसती, असेच पवारांना अपरोक्ष सुचवायचे असेल काय? चव्हाण आणि पवार यांच्यातला हाच एक सूक्ष्म किंवा मूलभूत फरक आहे. एकाला सभ्यपणा हा गुण वाटत होता, तर दुसऱ्याला सुसंस्कृतपणा ही राजकीय अडचण वाटत राहिली आहे. म्हणूनच या गुणांमुळे महाराष्ट्राला पंतप्रधानपदाची संधी हुकली, हा दावा गंभीरपणे तपासावा लागतो. हे गुण असल्यामुळे चव्हाणांची संधी दोनदा हुकली यात शंकाच नाही. पण पवारांचे काय? त्यांनाही त्यासाठी संधी आलेली होती. ती संधी त्यांनी कशामुळे गमावली, तेही स्पष्ट करायला नको का?

१९९६ सालात म्हणजे वीस वर्षांपूर्वी नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा दारूण पराभव झाल्यानंतर भाजपाचे अल्पमत सरकार स्थापन झाले; पण बहुमताअभावी वाजपेयींना राजिनामा द्यावा लागला. तेव्हापासून दोन वर्षे आघाडीचे प्रयत्न चालू होते आणि पवार लोकसभेतील विरोधी नेता होते. तेव्हा त्यांच्या इतका अनुभवी आणि जाणता नेता बिगर भाजपा गोटात नव्हता; पण इच्छुक असूनही पवार आपला दावा पेश करू शकले नाहीत, की कोणी त्यांचे नाव पुढे केले नाही. तेव्हा नरसिंहरावांना आव्हान द्यायला राजेश पायलट पुढे आले, तर त्यांना विश्वासात घेऊन पवारांनी आपले घोडे पुढे दामटले होते; पण प्रत्यक्षात रावांशी तडजोड करून माघार घेतली. मग तर केसरी यांनीही पवारांना कधी विश्वासात घेतले नाही. मग अन्य बिगरभाजपा विरोधकांच्या आघाडीत पवारांच्या नावाचा विचार कशाला होणार? मात्र यावेळी पंतप्रधान व्हायची शरद पवार नावाच्या मराठी माणसाला असलेली संधी सभ्यपणा वा प्रामाणिक सुसंस्कृतपणामुळे गेली नाही. हे गुण आडवे आले नाहीत. त्या गुणांचाच अभाव असल्याने पवार दावा करू शकले नाहीत, की त्यांचे नाव कुणाला पुढे करता आले नाही. ही महाराष्ट्राने पंतप्रधानपद गमावण्याची दुसरी वेळ होती. एकदा गुण आडवे आले आणि दुसाऱ्यांदा त्याच गुणांचा अभाव आडवा आला. वीस वर्षात वाजपेयींचा अपवाद करता देवेगौडा, गुजराल आणि दहा वर्षे मनमोहन सिंग हे पवारांच्या तुलनेत अगदी कमजोर उमेदवार होते. त्यांच्यापेक्षा पवार खुपच गुणी, अनुभवी व प्रतिभावान राजकारणी होते; पण पंतप्रधानपद मिळवण्यासाठी आवश्यक असलेली विश्वासार्हता आणि प्रामाणिकपणा, यांचा पवारांकडे दुष्काळ असल्याने सर्व पक्षात मित्र असूनही त्यांना तो पल्ला गाठता आला नाही. थोडक्यात सभ्यता व सुसंस्कृतपणा दोनदा महाराष्ट्राला अपशकुनी ठरला; पण एकदम भिन्न मार्गाने. यशवंतराव प्रामाणिक होते आणि पवारांचा त्याच गुणांशी छत्तीसचा आकडा!

■

# मचाणांची गँग



***माझे*** आजोबा सावकार, जमिनदार होते. त्यांची ठाणे जिल्ह्यात शेती होती व मुंबईत दाराशी वाहन म्हणून इंग्रजांच्या काळात 'बग्गी' होती. ग्रामीण भागात गेले की ते बैलगाडीही वापरायचे.

तर असेच ते बैलगाडीतून येत असताना बऱ्यापैकी रात्र झाली. जनावरांचे विशेषतः बिबट्या वाघांचे भय त्या डोंगराळ भागात तेव्हा खूप होते. वाघ शेतावरसुद्धा रात्री येऊन जायचा. कुत्र्याला फरफटत न्यायचा.

बैलगाडी अचानक थांबली नाही. 'कुणीतरी' सक्तीने थांबवली. बैल काहीतरी 'वेगळे' घडत असल्याचे जाणवून थांबले. अनेक लहान मुलांच्या हसण्या-खिदळण्याचा आवाज येत होता. ही इतकी पोरे रानवाटेवर आली कुठून? त्यांनी पटापट उड्या मारून गाडीचा ताबाच घेतला. कुणी आजोबांना गुदगुल्या करू लागले तर कुणी चिमटे काढू लागले. या हमल्यामुळे आमचे हे महादेवराव अगदी घाबरून गेले. भर थंडीत त्यांना भीतिने घाम फुटला. माकडांनी ओरबडावे तशी काही खोडसाळ मुले नखेही लावत होती. गाडीतल्या छोट्या छोट्या विकत आणलेल्या गोष्टी त्यांनी खाली फेकल्या. नासाडी केली. आजोबांना चक्कर येऊ लागली. त्या अवस्थेत ते पडून राहिले!

ती गँगवाली छोटी पोरे हसत खिदळत, गुण उधळत पळून गेली. त्यांच्या अंगावर कसलेही वस्त्र नव्हते. ती अगदी उनाड, मुक्त होती.

आजोबांना शुद्ध आली तेव्हा पहाट व्हायला आली होती. दोन ग्रामस्थ त्या रानवाटेने येताना पाहून आजोबांनी त्यांना थांबवले व आलेला अनुभव व त्या नागोड्या मुलांचा धिंगाणा सांगितला. तेव्हा ते गावकरी म्हणाले की, ''ही स्मशानाची जागा आहे. 'त्यांनी' तुमचा जीवच घेतला असता. वाचलात म्हणून वाचलात''. गावकऱ्यांच्या मते ती 'मचाणे' (लहान मुलांची भूते) होती. रात्री-बेरात्री कुणी एकटा दुकटा भेटल्यास ती गँग त्याला धोपटून काढायची. छळायची. त्या पिशाच्चांवर कुणाचेही नियंत्रण नव्हते. 'त्या' जंगली वाटेने त्यानंतर आजोबांनी रात्री कधीही प्रवास केला नाही.

आजोबा मद्यप्रेमी होते हे खरे, पण त्यामुळे इतके भास-भ्रम होतील का? आणि गावकऱ्यांना त्याआधी तसेच अनुभव कसे आले? की भूत योनी खरोखरीच असेल? तुम्हाला काय वाटते?

■ माधव गवाणकर
दापोली, जि. रत्नागिरी
९१४५९२४०५३

# दिल्लीच्या ऑड-इव्हनफॉर्म्युल्याच्या निमित्ताने

***दिल्लीचे*** मुख्यमंत्री युगपुरुष श्रीमान अरविंद केजरीवाल ह्यांच्या मर्कटचेष्टा बघून मला टोपीवाल्या माकडाची आठवण येते. अण्णा हजारेंची लंगोट धरून हा माणूस राजकारणात आला तेव्हा हा भ्रष्टाचाराचा विरोधी आहे असे वाटले. थोडा नावारूपाला येताच त्याने अण्णांच्या खांद्यावर पाय देऊन सरळ दिल्लीच्या राजकारणात उडी घेतली. त्यावेळी केंद्रात व दिल्लीत काँग्रेसचे सरकार असल्यामुळे त्याचा काँग्रेस हा नंबर एकचा शत्रू होता; पण दोन्ही ठिकाणी काँग्रेस पायउतार झाली आणि केजरीवालला दिल्लीत नेत्रदीपक यश मिळताच ते पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहू लागले. तेव्हापासून त्यांनी आपला नंबर एकचा शत्रू बदलला आणि आपला मोर्चा नवनिर्वाचित पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि भाजपाकडे वळवला. एल. जी. आणि दिल्ली पोलीस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे त्यांच्याशी देखील ह्यांचे सारखे हेतुपुरस्सर खटके उडत असतात. त्यांचा भ्रष्टाचार सम्राट असलेल्या काँग्रेसचा विरोध आता कुठे मावळला ते कळत नाही. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्या दिवसापासून त्यांनी मोदी व भाजपाच्या नेत्यांवर आरोप करण्याशिवाय दुसरे काहीच काम केले नाही. जणू काही स्वातंत्र्य मिळाल्यापासून ह्या देशाला भाजपनेच पोखरून टाकले आहे असे चित्र ते नेहमी रंगवीत असतात. परंतु, तरीही एका गोष्टीची त्यांना खंत आहे की, ज्या मोदींवर ते सतत टीका टिप्पणी व शिवीगाळ करतात ते ह्यांच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष देत नाहीत. साहजिक आहे, जो माणूस अवघ्या दीड वर्षात साऱ्या जगात लोकप्रिय झाला तो केजरीवाल सारख्या क्षुल्लक माणसाकडे कशाला लक्ष देईल? त्यामुळे ते मग मोदींच्या इतर मंत्र्यांवर निरनिराळे बिनबुडाचे आरोप करून जनतेचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. म्हणूनच मला त्या टोपीवाल्या माकडाची आठवण येते. सोशल मीडियावर देखील अशा माकडांची संख्या काही कमी नाही. जरा कुठे कुणी मोदींवर किंवा भाजपवर टीका केली तर... ह्यांचा त्यांच्याशी संबंध असो वा नसो... ह्यांना आनंदाच्या उकळ्या फुटतात आणि शहानिशा न करताच मोदी-भाजप विरोधातील अशी वक्तव्ये शेअर करण्यात धन्यता मानतात..

दिल्लीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी मागच्या पंधरा दिवसात त्यांनी एक अफलातून ऑड-इव्हन कल्पना राबवली. हा प्रयोग यशस्वी झाल्याचा दावा देखील ते करीत आहेत. सुरुवातीला भाजपा ह्या प्रयोगाला विरोध करील असा त्यांचा भ्रम होता आणि ते त्याचीच वाट पाहत होते. कारण प्रयोग यशस्वी होण्याविषयी ते स्वत:च साशंक होते. त्यामुळे प्रयोग अयशस्वी झाला तर त्याचे खापर भाजपाच्या व दिल्ली पोलिसांच्या डोक्यावर फोडायचे हा त्यांचा प्लान होता. मी तर बघा जनतेच्या हितासाठी काहीतरी चांगले करतोय पण हे केंद्र सरकार मला कामच करू देत नाही असा कांगावा करायला ते मोकळे झाले असते; पण एकाही भाजपा नेत्याने त्याविरोधात अवाक्षरही काढले नाही. दिल्ली पोलीस देखील सहकार्यासाठी तयार झाले आणि तिथेच केजरीवाल ह्यांची गोची झाली. ह्या योजनेत काही दम नाही हे सर्वांना कळत आहे पण विरोध करून आपल्यावर ठपका येण्यापेक्षा जनतेलाच काय चांगले वाईट ते परस्पर कळू द्यावे ह्या उद्देशानेच सगळे शांत बसले. तसेही दिल्लीच्या जनतेला धडा शिकवणे जरुरीचे आहे. मोफत वीज, पाणी, वाय-फायच्या मोहात अडकून त्यांनी कोणत्या अपरिपक्व माणसाला निवडून दिले ह्याची त्यांना जाणीव व्हायलाच हवी. मोफत मिळालेल्या गोष्टींना आपल्या आयुष्यात किंमत नसते. वीज-पाणी ह्यासारख्या गोष्टी आधीच अल्प प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यात जर त्या फुकट मिळाल्या तर त्यांच्या वापरावर नियंत्रण राहणार नाही हे समजायला हवे. असो...

आता केजरीवाल ह्यांच्या ऑड-इव्हनच्या बोगस फॉर्म्युल्याकडे पुन्हा वळूया. वायू प्रदूषणाचे मानक pm २.५ आणि pm १० (particulate matter) मध्ये निर्धारित होतात. ह्यातील pm१० च्या अंतर्गत ५६% रस्त्यावरील धूळ, १४% बांधकामातून येणारी धूळ, १०% कारखान्यांमधून निघणारी धूळ व धूर ह्यामुळे असते. वाहनांच्या धुरामुळे होणारे प्रदूषण हे फक्त ९ टक्के असते. pm२.५ अंतर्गत येणारे प्रदूषण हे ३८% रस्त्यावरील धुळीमुळे व २०% वाहनांमुळे असते. दिल्लीतील एकंदर वाहनांमध्ये कारचे प्रमाण फक्त २० टक्के आहे आणि त्यातीलही ८० टक्के गाड्या ह्या पेट्रोल व सीएनजीवर चालणाऱ्या आहेत ज्यामुळे प्रदूषण होत नाही. उरलेल्या २० टक्के गाड्या डीझेल वर धावतात, त्या अशा किती प्रदूषण करणार आहेत? त्यामुळे फक्त कारसाठी ऑड इव्हन फॉर्म्युला लावून केजरीवाल ह्यांना काय साध्य करायचे आहे ते कळत नाही. प्रत्येक व्यक्ती ऑड आणि इव्हन नंबर असलेल्या दोन दोन गाड्या जवळ बाळगणार आहे का? आणि घेतल्या तरी पार्किंगची केवढी मोठी समस्या उभी राहणार आहे? कुठल्याही अपार्टमेंट मध्ये प्रत्येक फ्लॅटधारकाला एका गाडीच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध असते, मग दुसरी गाडी काय रस्त्यावर ठेवणार? अजून एक गोष्ट, ज्या गाड्या रस्त्यावर धावतील त्यात महिला, व्हीआयपी, बसेस, टॅक्सी, सरकारी वाहने इत्यादी अशा बऱ्याच वाहनांना सूट देण्यात आली आहे. (ह्या सुटीचा मी मात्र लाभ घेणार नाही असे आधीच सांगून स्वत:चे मोठेपण सिद्ध करण्याचा पण डाव त्यातून साधला हे वेगळे) ह्या व्यतिरिक्त ह्याच कालावधीमध्ये शाळा बंद आहेत त्यामुळे वाहतुकीवरील तेवढा बोझा कमीच. कार पुलिंग हा त्यांनी सुचवलेला उपाय जरी सोपा वाटत असला तरी, त्यासाठी फक्त नोकरदार वर्गाचाच विचार करण्यात आला आहे असे नाही का वाटत? व्यवसायानिमित्त दिवसभर फिरणाऱ्या लोकांनी कुणासोबत कार पुलिंग करावे बरे? मेट्रो आणि सिटी बसेसच्या भरवशावर व्यापाऱ्यांनी जर धंदा करतो म्हटले तर दिवसभरात २० टक्के देखील काम करू शकणार नाहीत.



बरं ह्या व्यतिरिक्त प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्यांमध्ये डीझेलवर चालणाऱ्या जनरेटर्सचाही समावेश होतो. त्यांचा विचार केलाच नाही का? शिवाय नोव्हेंबर-डिसेंबर च्या काळात पंजाब हरियाणाचे शेतकरी धान्याचे अवशेष जाळून टाकतात त्यामुळेही त्या काळात दिल्लीच्या भागात प्रदूषण असते जे जानेवारीमध्ये हळूहळू कमी होत जाते. जानेवारीतच थंडी असल्यामुळे आर्द्रतेमुळे साहजिकच हवेतील प्रदूषण कमी असते आणि नेमका हाच महिना केजरीवाल ह्यांनी निवडला. कारण प्रदूषण कमी झाले तर त्याचे श्रेय स्वत: लाटता येईल. न झाले तर केंद्र सरकारने सहकार्य केले नाही म्हणून ठपका... असा हा दुहेरी डाव.

खरे म्हणजे, मागच्या महिन्यातच ग्रीन ट्रीब्युनलने मागच्याच महिन्यात एक अहवाल दिल्ली सरकारला सादर केला होता. त्यात दिल्लीवर उद्भवलेल्या भयंकर विषारी वायू प्रदूषणावर ताशेरे ओढण्यात आले होते आणि त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासंबंधीनिर्देश देण्यात आले होते. त्यामुळे केजरीवाल ह्यांनी तातडीने ह्या ऑड-इव्हनफॉर्म्युल्याची खेळी खेळली आणि त्यात सध्या तरी ते यशस्वी झाल्याचे वरकरणी दिसते आहे. तसेही अशा खेळी खेळण्यात ते माहीर आहेत. परंतु त्यातील फोलपणा लवकरच जनतेच्या लक्षात येईल.

◆ **प्रदीप मार्कंडेय**
दुबई
मो. ००९७१ ५५७२४२३५४
e-mail: pradeepmarkandeygmail.com

# साधना



***फेसबुक*** चाळत असताना अचानक एक बातमी नजरेस पडली. साधना शिवदासनी यांचं निधन. साधना नावं ऐकलं होतं, माहीत होतं की कोणीतरी मोठी सुप्रसिद्ध अभिनेत्री होती, पण त्याच्यापलीकडे काही माहीत नव्हते. मग मी इंटरनेटवर सर्च मारला, काही माहिती मिळाली; पण साधनाबद्दल अजून जाणून घेण्याचं वेड लागलं. मी तरुण असल्याने जुने आणि तेही साठच्या काळातले सिनेमे बघणं माझ्यासाठी बोरिंग काम होतं. जुने सिनेमे म्हणजे 'कंटाळवाणे तीन तास' असंच वाटायचं; पण साधना यांची माहिती पाहून अगदी साठच्या दशकातले त्यांचे काही सिनेमे मी पाहिले. 'वह कौन थी?', 'मेरा साया', 'असली नकली' सारखे काही सिनेमे पाहिले आणि मी साधनाच्या प्रेमात पडले.

'नैनो मे बदरा छाये, बिजली भी चमके हाये' हे गाणं ऐकलं आणि काही वेळ मी गप्प होते, एका स्त्रीचं एका पुरुषावर असलेलं प्रेमावरची गाणी मी खूप पहिली आहेत, ऐकली आहेत; पण हे गाणं ऐकताच मी सुन्न झाले होते, प्रेमाची एक नवी परिभाषा या गाण्याने माझ्यासाठी मांडली होती. एवढं विलक्षण, हृदय पिळवटून टाकण्याची क्षमता या गाण्यात आहे. आज माझा फोन 'हनि सिंग', 'बादशाह', 'डीजेवाले बाबू', 'फेविकॉल से', 'सूरज डूबा हे यारो दो घुट नशे के मारो' असल्या गाण्यांनी गच्च भरला आहे आणि त्यात अजून एक गाणं मी ऐकलं 'तेरा मेरा प्यार अमर, फिर क्यों मुझको लगता है डर' आई शप्पथ माझं पिळवटलेलं हृदय (नैनो में बदरा गाण्याने) हलकेच मलम लावल्यासारखे प्रेमात पडलं, पडलं कसलं पार अखंड बुडालं. ह्या गाण्याचा एक न एक शब्द तुम्हाला प्रेमाची झिंग लावल्याशिवाय सोडत नाही. सांगण्याचा अट्टहास ह्यासाठी की एखादा साधनाची गाणी आणि सिनेमे बघा (बघता येतील तेवढे) तुम्हाला ती लगेच कळेल सहज!

थायरॉइडसारख्या आजारामुळे तिला खूप अडचणींचा सामना करावा लागला. थायरॉइडमुळे तीची सिनेमा कारकीर्द खालावली. १९६६-६७ या दरम्यान त्या बॉस्टनला जाऊन सर्जरी करून आल्या. त्यांच्या चमकणाऱ्या कारकिर्दीत हा आलेला मोठा अडथळा त्यांनी पार केला. डोळ्यांची शस्त्रक्रिया करून आल्यावर त्यांनी 'इन्तेकम'(१९६९) सारखा हिट सिनेमा दिला. १९७४ साली 'गीता मेरा नाम' हा हिट सिनेमा त्यांनी दिला. ज्याचं दिग्दर्शन पण त्यांनीच केलं होतं. मग मात्र त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टितून कायमची निवृत्ती घेतली, एका मुलाखतीत त्यांनी सांगितलं होतं की, त्यांना सहाय्यक भूमिका नव्हत्या साकारायच्या.


मग मात्र साधना कधीही लोकांना दिसली नाही, अगदी त्यांच्या मध्यवयाचा एकही फोटो तुम्हाला कुठेही सापडणार नाही. कारण त्यांची इच्छा होती की त्यांना लोकांनी, त्यांच्या चाहत्यांनी एक सुंदर, खुबसुरत साधना म्हणूनच लक्षात ठेवावं.

आता हल्ली २०१०च्या वेळी त्यांच्या घराच्या वादातून पुन्हा एकदा त्या प्रकाशझोतात आल्या. या सुप्रसिद्ध अभिनेत्रीला एवढ्या अडचणींचा सामना करावा लागतो आणि तेही वृद्ध वयात हे दुर्दैवी! डोळ्यांची समस्या आल्यामुळे त्यांना काही सिनेमांना मुकावं लागलं. कठीण प्रसंगी काही जणांनी त्यांना साथ दिली तर काही जणांनी साथ सोडली! र. क. नय्यर (लव इन सिमलाचे दिग्दर्शक) यांच्या सोबत १९६६ ला लग्न केले, घरातल्यांचा विरोध असतानाही त्यांनी घरातल्यांना कसंतरी समजावून हे लग्न केलं आणि ते टिकलंही. नय्यर १९९५ साली अस्थमाने गेले, त्यानंतर मात्र साधना एकटीच होती.

पण त्या कधीच डगमगल्या नाहीत, आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक सुखाला किंवा दु:खाला कशाप्रकारे खेळवावं हे मी त्यांच्याकडून शिकले. घडणाऱ्या गोष्टींकडे डोळसपणे, सकारात्मक दृष्टिने पहावे हे मी शिकले. माणूस कितीही मोठा झाला तरी सगळ्यांसोबत त्याने प्रेमाने वागले पाहिजे हे त्यांच्या आयुष्यातून दिसतं. अशी ही अभिनेत्री गेली, माझ्यासारख्या तरुणीला साठच्या दशकातले सिनेमे पहायला भाग पाडणारी, मला कायमची 'डायहार्ड' चाहती बनवून ती गेली. त्यांचा साधनाकट आणि चुडीदार कुर्ता कुणीही विसरू शकणार नाही. तिला माझ्या या पिढीकडून सलाम!

◆ **सुप्रिया जगताप**
कोपरखैराने, नवी मुंबई
८८९८६८०४६५/९८३३९००४२८

# भावस्पर्शी ‘माझी कविता’




**कवयित्री :** सरिता कमळापूरकर
**प्रकाशक :** चपराक प्रकाशन, पुणे
**पृष्ठे :** ६४ **किंमत :** ६० रु.
**संपर्क :** ७०५७२९२०९२

***कविता*** ही कवी-कवयित्रीच्या अंतरीच्या खोल तळातून जन्म घेत असते. आपल्या मनातील भावनांचा अविष्कार कवी-कवयित्री कवितेतून प्रकट करतात. त्यांच्या मनाचेच प्रतिबिंब जणू कवितेत उमटत असते. शब्दांच्या फटकाऱ्याने विश्व हलविण्याची ताकत कवितेमध्ये असते. मनातील अस्फूट भावना कधी जहाल तर कधी हळूवारपणे शब्दबद्ध करताना कविता आपोआप गुंफत जाते. कवितेमधून त्या कविचे-कवयित्रीचे भावविश्व, वेगळेपण, समृद्धी वाचकांच्या नजरेत भरते.

‘माझी कविता’ हा सरिता कमळापूरकर यांचा काव्यसंग्रह त्यांचे वेगळेपण दाखवून देतो. कवयित्री भाविक आहे. परमेश्वरावर तिची नितांत श्रद्धा आहे. मुळारंभ जो आरंभ गणनायक कवयित्रीचे श्रद्धास्थान आहे.

**कोटी कोटी सुर्यचंद्र**
**तेजाळत रंध्र रंध्र**
**भासतात क्षीण रे**
**तुझ्यासमोर दाहका**

असे म्हणताना हा गणनायक जरी दाहक असला तरी त्याची दाहकता हर केवळ दुष्ट दुर्जनांसाठी आहे. एरवी तो शरदातील चांदण्यांपेक्षाही शांत व शीतल असतो. असे कवयित्रीला सुचवायचे आहे. म्हणूनच त्या म्हणतात की,

**तृप्त धरा शांतवी**
**तुझीच रम्य शीतलता**

कवयित्रीची मनोवस्था ही भगवंताशी एकरूप पावणारी आहे. समूळ सृष्टीचे मूळ ओंकारात दडलेले आहे. या ओंकाराची धून गुंजताना कवयित्रीचे मन ब्रह्मानंदी तल्लीन होऊन जाते.

या काव्यसंग्रहातील कवितांचा प्रवास हा अनुभवसंपन्न प्रवास वाटतो. कवयित्रीने अनेक वादळे पेलली आहेत का? असे राहून राहून वाटते. आपल्या जवळचे कोणी दूर गेले तर तो विरह वेदनादायी असतो. आपल्या माणसाने आपणास सोडून दूर जाऊ नये कारण तो आपला सखा असतो सोबती असतो. तो दूर गेला तर जीवन वावटळ बनून राहते. कवयित्री म्हणतात की,

**रान धुंडता धुंडता**
**सारी वाट हरवली**
**फिरे फुफाट पाचोळा**
**सारी वावटळ झाली**

त्याच्या विरहाच्या वेदना उरी दाटून येताना मन वाऱ्यासारखं सैरभैर धावतंय, विचारांचा कल्लोळ दाही दिशांनी दाटतोय, हेच जणू कवयित्रीला म्हणायचे आहे.

**उरी वेदना मावेना**
**वीज धावे दिशाभर**

कवयित्रीला प्रतिभेचा हळुवार स्पर्श लाभलेला आहे. प्रतिभेचं वरदान लाभल्यामुळं ही प्रतिभा त्यांच्यावर रूसलेली मूळातच नाही. पण कधी कधी त्यांना वाटते की ही रूसली की काय आपल्यावर? हा त्यांचा मनाचा भास वाटतो. आपल्या प्रतिभेस रूसू नको असे समजूतच्या सूरात सांगताना एका तरल, भावस्पर्शी कवितेचा जन्म झाला आहे कारण कवयित्रीला सोडून त्यांची प्रतिभा दूर राहूच शकत नाही. तरीही तिचे आर्जव करताना सरिता कमळापूरकर म्हणतात की,

**दार उघडले प्रिये**
**आता करू नको बंद**

प्रतिभेचा हा दरवाजा कवयित्रीसाठी सदैव खुला आहे व खुलाच राहणार आहे.

‘दिवाळी’, ‘पत्राचं उत्तर’ यासारख्या कवितांमधून एक उदास खिन्नता जाणवत राहते. क्षीतिज कवेत घेण्यासाठी मुले दूरदेशी निघून जातात. त्यांच्यासाठी दाहीदिशा मोकळ्या असतात. नव्या युगांची आव्हानं असतात. अशावेळी आईबाबांचं व्याकूळ होणं साहजिकच असतं, म्हणून झुरत बसण्याची कवयित्रीची मानसिकता नाही. उलट आपल्या बळ मिळालं पाहिजे, त्यांचा आकाश उजळलं पाहिजे या आधुनिक विचारसरणीची ही कवयित्री आहे.

‘लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे तुमचं आकाश’ असे म्हणताना कवयित्रीचा उत्तुंग आशावाद दिसून येतो. क्षीतिजाच्याही पलीकडलं आपल्या मुलांना काहीतरी शोधायचं आहे. तेव्हा त्यांची पाठराखण तर करायलाच हवी.

सरिता कमळापूरकर यांच्या काव्यप्रतिभेस कोणतेही बंधन नाही. त्या जशा हळूवार, तरल भावना जोपासतात तसेच विद्रोहही करून उठतात. सध्याची सामाजिक बंधने, दुष्टता, अन्याय यांच्याविरूद्ध त्यांचे मन बंड करून उठते. संपूर्ण सामाजिक व्यवस्था ही अन्यायी आहे, म्हणून या व्यवस्थेशी लढा दिलाच पाहिजे या ठाम निर्धारावर त्या म्हणतात की,

**उचल पहाड, फोड खडक**
**दे धडक बेधडक**
**संकटाशी असा भीड, अन्यायाची राख चीड**
**नको निराशा नको रड, लढ बापू लढ**

जुलमी व्यवस्थेविरूद्ध लढण्याचं बळ देणारी कवयित्री ही निराळीच.

सरिता कमळापूरकर यांनी काही गेय कविताही अतिशय सुंदरपणे या काव्यसंग्रहात संग्रहीत केल्या आहेत. ‘तुला पाहिले मी’ ही कविता सुरात गाताना श्रोत्यांना उच्चप्रतिचा आनंद देऊन जाते. प्रेयसी, प्रियकर आणि प्रेम हा या कवितेचा आत्मा आहे. आपल्या प्रेयसीला पाहून सहज सुंदर सुचलेल्या या ओळी तितक्याच सहज, सुंदर व तरल आहेत. हा प्रियकर जणू स्वत:लाच आपल्या सखीच्या रेशीमसर केसामध्ये गुंफून घेतो आहे.

**भिजली पहाट होती**
**ओल्या दवात जेव्हा**
**सर चिंब मोतीयांचे**
**केसात माळताना.. तुला पाहिले मी**

कवयित्री कवितेच्या या जगात मुक्तपणे संचार करताना दिसते. प्रेम, विरह, विद्रोह, बाल्य या सर्व क्षेत्रात सहज मुसाफिरी करताना ती कुठेही अडकून पडत नाही.

‘सपान’ या कवितेतून भंगलेल्या स्वप्नांचं केलेलं टिपण काळजाला जाऊन भिडतं आणि स्वप्नातला तकलादूपणाही जाणवतो. हिरव्या धरतीचं स्वप्न पाहणारी ती पुढे ते स्वप्नंच विसरून जाते. नवऱ्याच्या जाचात येवढी भरडली जाते की आता तिला दिसतो केवळ ‘तिचा फासी घेतलेला बाप आणि कुंकू भंगलेली माय’. ही अस्वस्थता वाचकांच्या मनाला जाणवत रहावी एवढी विषण्णता या कवितेत उतरून आली आहे.

माणूस म्हणून जगताना सामाजिक कणव असणंही किती गरजेचं आहे हे त्यांच्या ‘नाही बोललास जरी’ या मतिमंद मुलांसाठी लिहिलेल्या कवितेतून जाणवते. कवयित्री जणू या मुलांची आई होऊन जाते.

**बाळा तुझ्या वाटेवर**
**माझ्या उभ्या आयुष्याचा**
**दीप ठेवील तेवता**

हे वाचताना तिच्या मनातलं आईपण जाणवतं.

गतस्मृतीत रमताना कवयित्रीसमोर अनेक प्रश्न उभे राहतात. स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना ती सांगते की, चहू बाजूंनी भिंती आहेत, श्वास कोंडला आहे तरीही सर्वजण स्त्ती स्वातंत्र्य आहे असा ओरडा करतात. असलं फसवं स्वातंत्र्य तिला मान्यच नाही. कवयित्री म्हणते,


**मला हवा एक थेंब ओलाव्याचा**
**जो असेल**
**फक्त माझ्यासाठी**

एकूणच सर्व क्षेत्रात सहज संचरणारी, मुशाफिरी करणारी अशी ही कवयित्री आहे. म्हणून सरिता कमळापूरकर यांचा ‘माझी कविता’ हा कवितासंग्रह वाचकांच्या संग्रही हवाच!

◆ **माधव गिर, दिघी**
८९७५८७८८०३

# वंश आणि अंश

## एक समाज प्रबोधनपर लघुनाटिका




**लेखक** : मनोहर महादेव भोसले
**प्रकाशक :** डॉ. सुनील पाटील
कवितासागर प्रकाशन
**मूल्य** : ४०
**संपर्क - ०२३२२-२२५५००, ०९९७५८७३५६९**

लेखक मनोहर महादेव भोसले यांनी स्वत:च्या मनोगतामध्ये आजच्या काळातील स्त्रियांच्या बदलत्या विचार सरणीला स्पर्श केला आहे. लग्नामध्ये किंवा लग्न झाल्यावर अनेक वस्तूंच्या किंवा आर्थिक गोष्टींबद्दल एकमेकांचे वाद विवाद असतात. परंतु लेखकाने अनुभवलेल्या एका प्रसंगांमध्ये स्त्रीचे मत स्पष्टपणे आणि योग्य ठिकाणी मांडणे कितपत आवश्यक आहे, याची सर्वांना नक्कीच कल्पना येईल. आजच्या या २१ व्या युगातील महिलांमधील शारीरिक, मानसिक, भावनिक वैचारिक बदला बद्दलची ही लघुनाटिका आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान मानले जाते परंतु काही धार्मिक पंडित म्हणवून घेणाऱ्या व्यक्तींच्यामूळे लिंगभेद निर्माण केला जात आहे. त्याचा परिणाम संपूर्ण मानव जातीवर होतो आहे. लिंगभेदामुळे अनेक नवनवीन वाद विवाद होत आहेत. पुरुषांना सर्व बाबतीत मुक्तता असते परंतु स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने घातली जातात. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान मनाली जाते परंतु कोणताही पुरुष हा स्त्री शिवाय अपूर्णच आहे.

वंश आणि अंश या लघुनाटिकेमध्ये लेखकाने एका काल्पनिक विवाहात स्त्री पुरुषामध्ये लिंगभेदामुळे घटस्फोट घेण्यासाठी ते कोर्टामध्ये जातात. त्या दोघांनाही घटस्फोट हवा असतो परंतु त्यांना तीन मुली असतात त्या मुलींच्या जोपासनेसाठी लागणारी पोटगी त्या महिलेला मिळावी यासाठी ते कोर्टात जातात. तेथे त्या स्त्रीला सर्वजण वंशाचा दिवा मानला जाणारा मुलगाच हवा आणि ते ती स्त्री देऊ शकत नाही म्हणून तिचा पती घटस्फोट घेत असतो. परंतु मुलं जन्माला घालणे हे फक्त एका स्त्रीचे काम नसून त्यामध्ये पुरुष देखील खूप महत्त्वाची भूमिका बजावत असतात. कोर्टामध्ये काही जेष्ठ आणि तज्ज्ञ व्यक्ती तसेच डॉक्टर यांना बोलावून मुलं जन्माला घालणे, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी या सर्व बाबींची चर्चा होते.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार स्त्रीमध्ये फक्त द पेशी असतात तर पुरुषामध्ये द आणि ध अशा दोन प्रकारच्या पेशी असतात. पुरुषापासून मिळालेल्या पेशींनुसारच जे बाळ जन्माला येणार आहे ते स्त्री किंवा पुरुष ठरत असते त्यामुळे स्त्रियांना दोष देण्यापेक्षा पुरुषही तितकाच जबाबदार आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे. स्त्री ही नेहमी जमिनीची भूमिका बजावते तर पुरुष हा शेतकऱ्याची भूमिका बजावत असतो पुरुष जे पेरतो तेच उगवत असते. मग पुरुषाने काय पेरायचे ते स्वतः ठरवावे लागेल.

लेखक मनोहर भोसले यांनी मुलगा किंवा मुलगी या दोघात ही वंश न समजता तो आपला अंश आहे म्हणून त्याचा सर्वांगीण विकास केला पाहिजे. असा मुक्त विचारसरणीचा संदेश खूप छान पद्धतीने दिला आहे. शाळा, कॉलेज, महाविद्यालयामध्ये ही लघुनाटिका सादर व्हावी आणि समाज जागृतीचे आणि प्रबोधनाचे कार्य होणे आवश्यक आहे आणि ते वंश आणि अंश या लघु नाटिकेतून नक्कीच होईल असा मला ठाम विश्वास वाटतो. लेखकाला पुढील लिखाणासाठी खूप खूप शुभेच्छा.

◆ **मंगेश विठ्ठल कोळी**
(लेखक-संपादक-समीक्षक)



# कम्फर्ट झोन

सुवर्णांकुर



सुवर्णा जाधव, मुंबई
९८१९६२६६४७

**वरिष्ठ** कार्यालयातून फोन आला होता आणि एक माहिती, संबंधित काम करणाऱ्या लिपिका बरोबरच पाठविण्यास सांगितले होते. माहिती होती मिसेस राणे यांच्या कामासंबंधी. त्यांना मी बोलावलं आणि सांगितलं की, ''तुमच्या कामाविषयी माहिती असल्याने तुम्हाला वरिष्ठ कार्यालयाला जायला हवं.'' आमचं कार्यालय दादरला आणि वरिष्ठ कार्यालय व्हीटीला. राणे म्हणाल्या, ''आत्ताच जायला हवं का? दुसरं कोणी माहिती घेऊन गेलं तर नाही का चालणार?'' म्हणजे लगेच जाण्याची त्यांची मानसिक तयारी नव्हती.

श्री. देसाई यांची पदोन्नती झाली. परंतु बाहेरगावी, पुण्याहून नाशिकला; पण त्यांनी पदोन्नती नाकारली. मी देसाई यांना विचारलं ''पदोन्नती मिळवण्यासाठी कितीतरी वर्ष घालवावी लागतात. तुम्हाला संधी मिळाली आहे तर स्वीकारत का नाही?''

यावर त्यांनी दिलेले उत्तर अगदी व्यापारी होतं. ते म्हणाले, ''पदोन्नतीने थोडाफार पगार वाढेल, पद वरचं मिळेल पण त्रास किती... घर शोधा, फॅमिली तिकडे न्या. सगळ्या गोष्टींचा तापच. ही नोकरी बरी. स्कूटरला किक मारायची की वीस मिनिटात ऑफिस आणि ह्या घरापासून सगळंच जवळ. सुखाचा जीव दुःखात कोण घालेल?'' एकूणच काय त्रासाशिवाय सहज काही मिळत असेल तर त्यात बदल करून थोडाफार त्रास घेऊन काही करण्याची काही लोकांना आवड नसते. 'कम्फर्ट झोन' सोडून जाण्याची त्यांची तयारी नसते.

अशीच काहीशी मन:स्थिति काही विद्यार्थ्यांची असते. घराजवळ कॉलेज हवं! माझ्या परिचयातल्या एका विद्यार्थ्याला विशिष्ट विषय आवडायचा आणि तो विषय दूरवर असलेल्या कॉलेजमध्ये होता आणि इतक्या लांब जाण्याची त्याची मानसिक तयारी नव्हती. इतक्या लांब रोज रोज कोण जाणार? असं म्हणून जे कॉलेज जवळ आहे तिथे त्याच्या आवडीचे विषय नसतानाही प्रवेश घेतला आणि मग करायचा म्हणून अभ्यास करू लागला, जायचं म्हणून कॉलेजला जाऊ लागला. त्यात मन रमेना. मार्कांची टक्केवारी, उपस्थिती यात घसरण होऊ लागली आणि स्वत:च्या निर्णयाचा त्याला पश्चाताप होऊ लागला. स्वत:चं भवितव्यही अंधारमय वाटू लागलं. कम्फर्ट झोन सोडण्याची तयारी नसल्यानेच हे सारं घडलं.

नोकरीबाबतही असं घडतं. आवडीची, शिक्षणाप्रमाणे अशी नोकरी जाहिरातीत दिसते पण 'इथलं सगळं सोडून इतक्या लांब परक्या शहरात कोण जाणार' म्हणून बरेचजण संधीवर पाणी सोडतात. याउलट जे प्रगतीसाठी स्वत:चं गाव, शहर, देश सोडतात. कम्फर्ट झोन ओलांडतात ते नक्कीच प्रगती करतात. निदान स्वत: काहीतरी प्रयत्न केल्याचे समाधान तर मिळवतातच!

काही आशादायक उदाहरणेसुद्धा आहेत. श्रीमंत-मध्यमवर्गीय पालकांची मुले स्वत:च आवडीचा कोर्स निवडतात आणि घरात सारी सुखे हात जोडून उभी असताना त्याचा त्याग करत कुठे हॉस्टेलला राहतात तर कधी दोन-तीन मित्रमैत्रिणी एक सम होऊन राहतात. आवडीच्या शिक्षणासाठी झगडतात. त्रास सहन करतात आणि आवडीच्या क्षेत्रात यश मिळवतात. हवा तसा मग आपोआप जॉब त्यांच्याकडे चालून येतो. आवडीच्या क्षेत्रात शिक्षण, आवडीच्या क्षेत्रात नोकरी यासारखं दुसरं सामधान नाही. त्यामुळे म्हणावसं वाटतं...

**मंजिल मिल ही जायेगी**
**भटकते ही सही**
**गुमराह तो वो है, जो घर से**
**निकले ही नही।**

असंही म्हणतात की, एखादी गोष्ट आयती, सहज, विनासायास मिळाली की तिचं महत्त्व वाटत नाही पण कष्टाने, स्वप्रयत्नाने केलेल्या परिश्रमाला, त्यागाला तोड नाही, त्यामुळे यशाची गोडी वाढते. म्हणून यश आनंद मिळवण्यासाठी 'कम्फर्ट झोन' सोडायची तयारी ठेवायलाच हवी! ■

---

## संक्षिप्त

समीर नेर्लेकर



९४२२५०८४७१

**मध्यरात्री** अनेक घरांमध्ये चोरी करून तो गावातून पळून गेला. पळता-पळता एका अरण्यात येऊन थांबला. तिथे एका झाडापाशी त्याने खड्डा खणला आणि चोरीचे सारे धन त्या खड्ड्यात लपवून ठेवले. त्याच झाडाला टेकून तो डोळे मिटून झोपून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजारच्या नगरातील काही लोक तिथून जात असताना त्यांनी त्याला डोळे मिटून बसलेल्या अवस्थेत पाहिले. ते नगराध्यक्षाकडे आले आणि म्हणाले,

''महोदय, आपल्या नगराबाहेरच्या अरण्यात एक योगी पुरूष ध्यान करत बसले आहेत.''

नगराध्यक्ष स्वत: पालखी घेऊन त्याला भेटायला आले. चोराने डोळे उघडले. तो घाबरून गेला. नगराध्यक्ष त्याच्या पुढे हात जोडून उभे होते. ते म्हणाले, ''महाराज, आपण खूप दूरून आमच्या नगरात आला आहात, असं दिसतंय. इथे आलाच आहात तर तीन दिवस आमच्या नगरात चला. तीन दिवसांचा उत्सव आहे. त्या उत्सवात तुमचे प्रवचन ठेवू. तुमच्या ज्ञानाचा लाभ आम्हालाही होऊ द्या.''

चोर घाबरून गेला. तो काहीच बोलला नाही. त्याने फक्त मान हलवली.

उत्सवाचा पहिला दिवस, भव्य सभामंडपात प्रवचन आयोजित केले होते. प्रवचन ऐकण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. चोर व्यासपीठावर बसला होता. त्याने श्रोत्यांना विचारले, ''मी आज काय सांगणार आहे, हे तुम्हाला माहीत आहे का?''

सर्व श्रोते एकसुरात म्हणाले, ''नाही.''

चोर म्हणाला, ''मी काय सांगणार हे जर तुम्हाला माहीतच नसेल तर मी इथे प्रवचन देऊन काहीच उपयोग होणार नाही.'' एवढे बोलून तो उठला व तावातावाने निघून गेला.

नगराध्यक्ष श्रोत्यांवर नाराज झाले. ते व्यासपीठावर आले व म्हणाले, ''तुम्ही 'नाही' का म्हणालात? ते अध्यात्मावर बोलणार होते. उद्या मी त्यांना पुन्हा इथे आणीन. त्यावेळी सर्वजण 'हो' म्हणा.''

प्रवचनाच्या दुसऱ्या दिवशी चोराने पुन्हा तोच प्रश्न विचारला. सर्वांना एकसुरात 'हो' म्हटले. तो चिडून म्हणाला, ''तुम्हाला जर माहीत आहे तर मला इथे का बोलावले?'' असे बोलून तो निघून गेला.

नगराध्यक्ष श्रोत्यांना म्हणाले, ''उद्या प्रवचनाचा शेवटचा दिवस आहे. आपल्याला त्यांचे विचार एकायचे आहेत. उद्या जर त्यांनी काही विचारले तर अर्धे जण हो म्हणा आणि अर्धे जण नाही म्हणा.''

प्रवचनाच्या तिसऱ्या दिवशी चोराने व्यासपीठावरून पुन्हा तोच प्रश्न विचारला. श्रोत्यांमधून निम्म्या लोकांनी 'हो' म्हटले आणि निम्म्यांनी 'नाही'.

चोर म्हणाला, 'मग ठीक आहे. मी काय बोलणार हे निम्म्या लोकांना माहीत आहे आणि निम्म्या लोकांना माहीत नाही. ज्यांना माहीत आहे त्यांनी माहीत नसलेल्या लोकांना सांगून टाका. माझे इथे काहीच काम नाही,'' असे बोलून तो तिथून निघून गेला.



# प्रवचन

मूळ चिनी कथा : लाओ त्सू.

---




## 'चपराक प्रकाशन'ची दर्जेदार ग्रंथसंपदा

कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट (प्रतिवाद) । **भाऊ तोरसेकर** । १५०
दखलपात्र (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
झुळूक आणि झळा (अग्रलेख संग्रह) । **घनश्याम पाटील** । १५०
कॉलेज गेट (कादंबरी) । **सागर कळसाईत** । २४९
मोरूनामा (विनोदी कादंबरी) । **विजय तरवडे** । १००
एमरल्ड ग्रीन (कथासंग्रह) । **समीर नेर्लेकर** । ७५
खुलजा सिम सिम (विनोदी कथा) । **सदानंद भणगे** । १००
टर्मिनस व्हिक्टोरिया (कादंबरी) । **रमेश गोविंद वैद्य** । १२०
श्रीराम एक चिंतन (वैचारिक) । **नरहरी पत्तेवार** । ८०
विज्ञानमूर्ती ज्ञानोबा तुकोबा (आध्यात्मिक) । **दत्तात्रय गायकवाड** । १३०
थोडं मनातलं (लेख संग्रह) । **विनोद श्रा. पंचभाई** । १२०
गढीचं गूढ (किशोर कादंबरी) । **सुभाषचंद्र वैष्णव** । ४०
चार शिलेदार (किशोर कादंबरी) । **सुभाष कुदळे** । ६०
नवलकथा (बालकथा) । **सुभाष कुदळे** । ४०
वाट इतकी सरळ (मर्माक्षरी संग्रह) । **श्रीराम पचिंद्रे** । ५०
ओविली फुले मोकळी (ललित संग्रह) । **सदानंद भणगे** । १५०
गंध माणसांचा (व्यक्तिचित्रण) । **संजय वाघ** । १३०
सत्यापितम् (कथासंग्रह) । **चंद्रलेखा बेलसरे** । १३०
शांतिदूत लालबहाद्दूर शास्त्री (चरित्र) । **प्रभाकर तुंगार** । ५०
एकनाथजी रानडे (चरित्र) । **सागर सुरवसे** । ७५
मुलांच्या मनातलं (बालकथा) । **विनोद श्रा. पंचभाई** । ७५
दगडखाणीतील उद्ध्वस्त आयुष्य (कादंबरी) । **हणमंत कुराडे**। ७५
तपोभूमी नाशिक (नाशिकची ओळख) । **रमेश पडवळ**। २३०
भाषेचं मूळ (भाषाशास्त्र) । **संजय सोनवणी** । ११०
पाषाणगंध (नाटक) । **सदानंद भणगे** । ५०
बस नंबर बेचाळीस (कादंबरी) । **सुभाष कुदळे** । १००
आपले राष्ट्रसंत (चरित्र) । **विनोद पंचभाई** । ६०
लोकनायक सयाजीराव गायकवाड (चरित्र) । **सौ. चंद्रलेखा बेलसरे** । ७०
गजरा (कथासंग्रह) । **दत्तात्रय वायचळ** । १००
कवडसे (लेखसंग्रह) । **स्वप्निल कुलकर्णी** । ११०
चौथा स्तंभ (आत्मचरित्र) । **सुभाष धुमे** । १००
स्वा. सावरकरांचा मानवधर्म (वैचारिक) । **सुधाकर द. जोशी** । १२०
बाळासाहेब एक अंगार (चरित्र) । **नागेश शेवाळकर** । १७५

चपराक प्रकाशन

या पुस्तकासाठी संपर्क :
**०२० २४४६०९०९, ७०५७२९२०९२**



## माझ्या आवडीची कविता

कवी – कुसुमाग्रज
रसिक – माधव गिर, दिघी
८९७५८७८८०३

अनामवीरा, जिथे जाहला तुझा जीवनान्त
स्तंभ तिथे ना कुणी बांधला, पेटली ना वात

धगधगता समराच्या ज्वाला या देशासाठी
जळावयास्तव संसारातून उठोनिया जाशी

मूकपणाने तमी लोपती संध्येच्या रेषा
मरणामध्ये विलीन होसी, ना भय ना आशा

जनभक्तीचे तुझ्यावरी नच उधाणले भाव
रियासतीवर नसे नोंदले कुणी तुझे नाव

जरी न गातील भाट उफावर तुझे यशोगान
सफल जाहले तुझेच हे रे तुझे बलिदान

काळोखातूनी विजयाचा हे पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्यूंजय वीरा

## देशभक्ती

मन सागरी उसळाव्या देशभक्तिच्या अनंत लाटा।
जेणेकरून स्फुरतील विकासाच्या नवनवीन वाटा।।

देशभक्तीपायी विसरून जावे मन, देह भावा।
देशापुढे नगन्य सारे, म्हणूनी भजावे देशदेवा।।

देशभक्तिचा असावा मनापासून अति अभिमान।
सर्वांनी देशभक्ती अशी करावी होई उन्नत देशाची मान।।

देश आहे म्हणूनी देह आपला शाबूत आहे।
कारण देह आपला देशाच्याच काबूत आहे।।

देशवासियांनो नका विसरू कधी आपुल्या देशदेवा।
करूनी त्याची यथार्थ सेवा सत्कार्यी लावा देहभावा।।

देशभक्तीस्तव आठवा त्या सर्व शूर वीरांना।
ज्यांनी अर्पियले सर्वस्व उन्नत करूनी आपुल्या माना।।

देशभक्तीचे असती म्हणूनी नानाविध प्रकार।
निवडा तुम्ही एक वा अनेक करा देशभक्ती साकार।।

❒ **मोरेश्वर ब्रह्मे, पुणे**
९३२६९३९१७६



## तिळगूळाचा उपदेश

स्वर्गलोकीच्या मधुर सरोवरातूनी
आलो मी भूलोकी
सरळ करण्या आलो मानवा
फिरलेली तुमची डोकी

शब्दाशब्दातून निर्माण होतो
वितंड वाद–विवाद
तोंडसुख घ्यायचा तू मानवा
कधी सोडशील नाद?

स्निग्धमधुर प्रतिक्रिया देण्याचं
दाखव तू औदार्य
हेच शब्दकौशल्य शिकविण्याचं
अव्याहत माझं कार्य

मी तिळगूळ काटेरी परी
कोमल असे अंतरी
खलवृत्तीचा नाश व्हावा
ही तळमळ माझी खरी

वैचारिक युद्धात नसावी कदापि
जीवित – वित्त हानी
नैतिकता डावलून करु नये
कधी कुणी मनमानी

प्रखर – परखड वाणीला द्या
स्निग्धतेचे वंगण
विचार क्षेत्रात माजवू नये
उगा रणकंदन

गोड बोला गोड रहा
टिकवून ठेवा गोडी
हसण्यावारी न्या जर
काढेल कुणी खोडी

खोडसाळांना द्या
मधुर भाषेत उपदेश
वठणीवर ते येतील
अन् शांत राहिल देश

❒ **सम्राट सदाशिव नाईक, पुणे**
९८२३८१४२२५

## राष्ट्र माझी माता

राष्ट्र माझी माता राष्ट्र मायपिता ।
पुण्याईची गाथा । राष्ट्र माझे।।
राष्ट्र माझी जननी चैतन्याची खाणी ।
अमृताची वाणी । राष्ट्र माझे ।।
निर्माल्याची गंगा वाहती नीर भरुनी ।
मांगल्याचा ध्वनी । राष्ट्र माझे ।।
नाना परंपरा संगम सुरेख ।
अनेकात एक । राष्ट्र माझे ।।
इतिहासाच्या पानी फुले स्वाभिमान ।
तळपे निशाण । राष्ट्र माझे ।।
विक्रम वैराग्य नांदती सांगाती ।
आद्यात्माची ज्योती । राष्ट्र माझे ।।
श्रेष्ठ स्वर्गाहुनी ऐसी ही पर्वणी ।
धन्य मी जीवनी । राष्ट्र माझे ।।
आसेतू हिमाचल, नटल विठ्ठल ।
भाव हा प्रेमळ । राष्ट्र माझे ।।

❒ **प्रभाकर चव्हाण, पुणे**
९६८९३८३१०६



## प्रिय बाबा

जन्माला आले तेव्हा कोवळी धूप होते
लुकलुकलेल्या दातात बोबडे माझे बोल होते
अंगाखांद्यावर खेळत, पहिलं पाऊल टाकलं,
आई म्हणण्या आधी बाबा म्हटले होते

लाडामायेत वाढून पावलावर पाऊल टाकले
शेवटी तुमचा हात धरून मी चालायला शिकले
माझ्या छोट्या छोट्या डोळ्यात मोठी स्वप्नं होती
तुमच्यामुळे कल्पनेतले स्वप्न स्वप्न माझ्यासोबत टिकले

शाळेच्या पहिल्या दिवशी मी रडते हे
सगळ्यांनाच दिसत होते
तुमच्या चिमुरडीला सोडून जाताना
तुमचे अश्रू देखील थांबत नव्हते

सकाळी झोपेत माझ्या डोक्यावरून हात फिरवून जाता
मला जगण्याचा धीर त्या स्पर्शाने देता
माझ्या काळजीने त्रस्त असता तुम्ही
मनातल्या मनात किती झुरता

मायेने मला पाठीवर शाबासकी देण्यासाठी
तुमची खूप गरज आहे
जीवनात खडतर रस्त्यावरून चालताना
तुमच्या विश्वासाची साथ आहे

संकटात अरे बापरे! म्हणताना
सहज तुमची आठवण येते
तुमची प्रतिमा माझ्या मनात
उत्तम मित्र, सहकारी म्हणून राहते

आयुष्यातल्या चढउतारांवर
कधीच मला एकटं सोडू नका
तुमचं बाळ अजूनही लहानच आहे
तुमच्या मऊ कुशीची त्याला अजूनही नितांत गरज आहे
तुमच्या ओरड्यात सकारात्मक विचार आहे
म्हणून तुम्ही माझे बाबा आहात
असा माझा अतूट विश्वास आहे

❒ **अनुष्का आगवणे**
दहावी अ, एंजल हायस्कूल
लोणी काळभोर

## खंत

जे जे घडवायचे ते ते घडून गेले
जे जे घडू नये ते ते घडून गेले

धरता जरा कुठे मी थोडीच ती अपेक्षा
फुसकाच बार ठरला सारे फसून गेले

सजली मनी न स्वप्ने अत्युच्च त्या सुखाची
आले न क्षण सुखाचे जगणे सरुन गेले

लपवून आसवांना हसवित राहिलो मी
दारापुढून माझ्या सारे हसून गेले

जुळवून घेतले मी हसऱ्या जरी जगाशी
ठरवून वेगळा मज नुसते बघून गेले

❒ **अशोक कुलकर्णी**
९३२३८३६७७१

साप्ताहिक ‘चपराक’साठी आपल्याही कविता अवश्य पाठवा

**संपादकीय कार्यालय : ‘चपराक’, ६१७, ‘साईकृपा’, पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२**

**Email :kavyapushp3@gmail.com**


# साहित्य परिषदेत परिवर्तन अटळ

## ■ प्रा. मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे, सुनिताराजे पवार, घनश्याम पाटील रिंगणात


प्रा. मिलिंद जोशी


प्रकाश पायगुडे


सुनिताराजे पवार


घनश्याम पाटील


सुनील महाजन


प्रमोद आडकर


ज्योत्स्ना चांदगुडे


स्वप्निल पोरे

**पुणे, (प्रतिनिधी) :**
पिंपरी येथे नुकतेच ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडते न पडते तोच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीचे वारे वाहायला सुरूवात झाली आहे. साहित्य परिषदेच्या भ्रष्ट पदाधिकाऱ्यांमुळे यंदा परिवर्तन अटळ असल्याची चर्चा आहे. परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी असलेल्या ३३ जागांकरिता ९० अर्ज आले असून छाननीदरम्यान त्यातील एक अर्ज अवैध ठरला असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. प्रताप परदेशी यांनी दिली.

नगर जिल्ह्यातील अशोक भानुदास व्यवहारे यांचा प्रतिनिधी पदासाठीचा अर्ज अवैध ठरला त्यामुळे ३३ जागांसाठी ८९ उमेदवार रिंगणात आहेत. सोमवार (दि. २५) अर्ज माघार घ्यायची तारीख असल्याने त्या दिवशी परिषदेच्या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. ठाणे (३), नाशिक (२), सांगली (१) आणि धुळे-नंदुरबार (१) या जिल्हा प्रतिनिधींची आणि पुणे शहर स्थानिक कार्यवाह क्र. ४ साठी माधव राजगुरू यांची बिनविरोध निवड झाली आहे. यामुळे आता या आठ जागा वगळता उर्वरित २५ जागांवर निवडणूक होणार आहे.

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते आणि लेखक प्रा. मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे, 'दिलीपराज प्रकाशन'चे राजू बर्वे, सुनील महाजन आणि ॲड. श्रीधर कसबेकर यांनी कार्याध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केले असले तरी प्रा. जोशी आणि बर्वे यांच्यातच खरी लढत होईल. प्रमुख कार्यवाह पदासाठी प्रकाश पायगुडे, प्रमोद आडकर, सुनील महाजन, कोषाध्यक्ष पदासाठी 'संस्कृती प्रकाशन'च्या सुनिताराजे पवार, 'अनुबंध प्रकाशन'चे अनिल कुलकर्णी, 'विशाखा'चे संपादक ह. ल. निपुणगे, डॉ. सतीश देसाई आणि अभिनेते योगेश सोमण रिंगणात आहेत.

स्थानिक कार्यवाह (क्र. १) साठी ज्योत्स्ना चांदगुडे आणि दीपक करंदीकर, क्र. २ साठी नीलिमा बोरवणकर, बंडा जोशी, जयंत भिडे, क्र. ३ साठी 'केसरी'चे वृत्तसंपादक स्वप्निल पोरे, कवी उद्धव कानडे, क्र. ५ साठी रमेश राठिवडेकर, वि. दा. पिंगळे तर स्थानिक कार्यवाह क्र. ६ साठी 'चपराक'चे प्रकाशक आणि संपादक घनश्याम पाटील, बाळासाहेब कुलकर्णी आणि प्रमोद आडकर निवडणूक लढवित आहेत.

प्रा. मिलिंद जोशी, प्रकाश पायगुडे, सुनिताराजे पवार यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेली १४ वर्षे 'चपराक'च्या माध्यमातून साहित्य क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या घनश्याम पाटील यांनी साहित्य परिषदेच्या निवडणुकीत सक्रिय सहभाग नोंदवल्याने त्यांचे जोरदार स्वागत होत आहे.

---

## जिल्हा अन्नधान्य वितरण व्यवस्था सदस्यपदी पल्लवी सुरसे यांची निवड



**लोणी काळभोर (वार्ताहर) :**
हडपसर येथील महिला काँग्रेसच्या पल्लवी प्रशांत सुरसे यांची पुणे जिल्हा सार्वजनिक अन्नवितरण व्यवस्था व दक्षता समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली. त्यांना जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी नियुक्तीचे पत्र दिले. यावेळी आ. मोहन जोशी, प्रशांत सुरसे, महेंद्र बनकर, स्वप्नील धर्मे आदी उपस्थित होते. सौ. सुरसे या महिला काँग्रेसच्या माध्यमातून महिलांसाठी कायम झटत असतात. महिला बचत गट, विविध प्रशिक्षण शिबिर, कन्यापूजन, रक्षाबंधन, आधार कार्ड शिबिर असे विविध कार्यक्रम घेत असतात. या परिसरातील समस्या कायम शासनापुढे मांडत असतात व त्या सोडवण्याचा सतत प्रयत्न करतात.

या निवडीबद्दल त्या म्हणाल्या की, ''राज्य शासनाने माझ्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. ती सर्वसामान्यांच्या हितासाठी राबवेन. रेशनिंग दुकानामध्ये मिळणारे धान्य हे गरिबांची गरजेची भाकरी असून ती त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी विशेष दक्षता घेऊ. तसेच याबद्दल काही तक्रार असल्यास माझ्याकडे द्याव्यात अशी मी जनतेला विनंती करते.''

या निवडीबद्दल हडपसर येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप शंकर तुपे, प्रितम पवार, अंकुश साळुंखे, अनिल सोनवणे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## अरूण कोटगी-बेनाडीकर यांना कथामाला कार्यकर्ता पुरस्कार



**गडहिंग्लज (वार्ताहर) :**
गोवा प्रदेश साने गुरूजी कथामाला संस्था, गोवा राज्याचे कला व संस्कृती संचालनालय, कथामाला केंद्र शिरोडा, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने पू. साने गुरूजी जयंती सप्ताह व राज्यस्तरीय कथाकथन स्पर्धा कार्यक्रमात गडहिंग्लज(कोल्हापूर)चे अरूण कोटगी-बेनाडीकर यांचा त्यांनी गोव्यात गेल्या चाळीस वर्षे कथामालेचे चांगले काम केल्याबद्दल प्रमुख पाहुणे डॉ. रामकृष्ण पारकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ रोख एक हजार रूपये व स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कथामाला संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग नाडकर्णी अध्यक्षस्थानी होते.

सदर पुरस्कार स्वातंत्र्य सैनिक कै. रामचंद्र नेवगी न्यासातर्फे अरविंद नेवगी यांनी त्यांच्या स्वर्गीय पत्नी सौ. वैशाली नेवगी यांच्या स्मरणार्थ दिला आहे. त्या कथामालेच्या सक्रीय कार्यकर्त्या होत्या. गोवा राज्याचे उद्योग, सहकार मंत्री ना. महादेव नाईक हे प्रमुख पाहुणे व शासकीय प्रतिनिधी म्हणून समारोप प्रसंगी उपस्थित होते.

वृत्तपत्र लेखक बेनाडीकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शिरोड्याचे सरपंच संदेश प्रभुदेसाई, शासकीय अधिकारी, विद्यार्थी, पालक, व कथामालाप्रेमी, नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. अरूण कोटगी-बेनाडीकर 'साहित्य चपराक'मध्ये विविध विषयांवरील लिखाण सतत प्रसिद्ध होत असते. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.




### सारांश कथा

कमीत कमी शब्दांमध्ये अधिकाधिक आशयसंपन्न मजकूर देणे ही काळाची गरज आहे. मोजक्या शब्दांत, नेमकेपणाने, मोठे सामर्थ्य असलेल्या सारांश कथा लिहिण्याचे युवा लेखक आणि कवी व्यंकटेश कल्याणकर यांचे कसब वाखाणण्याजोगे आहे. या लेखनामुळे सारांश कथा हा साहित्यप्रकार मराठीत पुनरूज्जीवित होत आहे. आजूबाजूला घडणाऱ्या हृदयस्पर्शी, वास्तववादी घटना, प्रसंग कथेच्या स्वरूपात गुंफून कल्याणकर यांनी वाचकांवर सकारात्मक संस्कार घडविले आहेत.

**लेखक :** व्यंकटेश कल्याणकर
**पाने :** ४८, **मूल्य :** ५०

### कॉलेज गेट

महाविद्यालयीन भावविश्वाचा वेध घेणारी सागर कळसाईत या तरूण लेखकाची कलाकृती! महाविद्यालयाच्या स्वच्छंदी वातावरणात तरूणाईचे विविध पैलू उलगडत जात असतात. भूतकाळातील आठवणी, भविष्याचा विचार आणि वर्तमानातील मौजमजा यांची सांगड घालताना तरूणाईची घालमेल होते. ही सांगड कशा पद्धतीने घालता येईल याची माहिती देणारी झक्कास कादंबरी. जे कॉलेज गेटच्या आत स्वच्छंदीपणे जीवन जगले, जे जगत आहेत किंवा जे जगतील त्या सर्वांसाठीच... मैत्री की प्रेम? या गुंत्यात अडकलेल्या प्रत्येक तरूणास ही कादंबरी मुक्त करेल!

काही सत्य अनुभव आणि काही काल्पनिक प्रसंग यांच्या मैफलीतून 'नाण्याची तिसरी बाजू' असा नवीन विचार मांडला आहे. अगदी हलक्या फुलक्या शब्दांचा आणि भावनांचा शिडकावा असलेली ही कादंबरी वाचकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते!



**लेखक :** सागर कळसाईत
**पाने :** ३२८, **मूल्य :** २४४

चपराक प्रकाशन

ही पुस्तके आमच्या www.chaprak.com या बेबसाईटवरून ऑनलाईन पैसे भरून घरपोच मागवू शकाल. या पुस्तकांसाठी संपर्क : ०२०-२४४६०९०९/७०५७२९२०९२


'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी नेद प्रिंटर्स, ५१८, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० येथे छापून शॉप नं. १, श्री दुर्गांकुर हौसिंग सोसायटी, १६१, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : घनश्याम वसंतराव पाटील.** (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलाही) (वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत)

संपादकीय कार्यालय : 'चपराक', ६१७, 'साईकृपा', पहिला मजला, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२. भ्रमणध्वनी : ९२२६२२४१३२ Email : info@chaprak.com